# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६१०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in


क्रमांक : १०/एआयसीटीई/पदविका/मान्यता/२००६/ ३४०
दिनांक : - 4 ऑगस्ट AUG 2006

प्रति,
प्राचार्य,
संत गजानन महाराज रुरल फार्मसी कॉलेज,
मु.पो. महागांव, ता. गडहिंग्लज,
जि. कोल्हापूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २००६-२००७ पासून विना अनुदान तत्वावर नवीन औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र.मान्यता-२००५/(७०३/०५)/तांशि-६, दि. २४.०५.२००६.
२) या कार्यालयाचे पत्र क्र.१०/एडीएम/पदविका/मान्यता/२००६/१७८, दिनांक १९.०६.२००६.

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यांत येते की, शासनाने संदर्भाधीन क्रमांक-१ च्या शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेस शैक्षणिक वर्ष २००६-२००७ साठी खालील पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था त्यांच्यासमोर दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहीत अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | औषधनिर्माणशास्त्र पदविका | ६० |

या संचालनालयाच्या संदर्भाधीन क्रमांक-२ च्या पत्रान्वये दिलेल्या परवानगीस अनुसरुन वरील पदविका संस्थेसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची नियत ठेव म्हणून सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे व सचिव, संत गजानन महाराज रुरल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, महागांव, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर यांच्या संयुक्त खात्यात रुपये २०.०० लाख देना बँक, शाखा महागांव येथे पावती क्रमांक : २८३२३९९, दिनांक २७.०७.२००६, अन्वये १० वर्ष मुदतीसाठी नियतठेव म्हणून भरलेले आहेत. तसेच वरील अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व सचिव, संत गजानन महाराज रुरल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, महागांव, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर यांच्या संयुक्त खात्यात रुपये ५.०० लाख भारती सहकारी बँक लि., कोल्हापूर शाखा येथे पावती क्रमांक : ०६४२७६, दिनांक २९.०६.२००६, अन्वये ५ वर्ष मुदतीसाठी नियतठेव म्हणून भरलेले आहेत व वरील अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षासाठी रुपये ५.०० लाख, इतक्या रकमेची ५ वर्षासाठी नियतठेव संदर्भाधिन क्रमांक-२ मध्ये नमूद केल्यानुसार भरण्यात यावी. सदर शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून उपरोक्त नमूद केलेला अभ्यासक्रम सन २००६-२००७ पासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यास प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यांत येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेशक्षमता उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.

३. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक : टिईएम ३३८२/११९८३६/(१९०)तांशि-१(अ), दिनांक २१ मे १९८३ अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती संस्थेस बंधनकारक असतील.

४. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यांत यावे. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

५. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यांत आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे.तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

७. शासन किंवा या संचालनालयाने किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांनी प्राधिकृत करण्यांत आलेले अधिकारी यांस संस्थेचे निरीक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेस आढळून येणाऱ्या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

८. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांच्याकडून घेतल्या जातील.

९. संस्थेला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

१०. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फी किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

११. शासनाने, या संचालनालयाने, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

( प्रा. न. बा. पासलकर )
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :
१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन पत्राचे संदर्भात माहितीसाठी सादर.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव सादर.
३. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
४. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे.
५. श्री.एन.बी.पाटील सिस्टिम ॲनालिस्ट यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
६. कार्यासन क्र.२-अ यांना माहितीसाठी.
७. निवड नस्ती.